**आकाशवाणी नागपूर,**

**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**

**शुक्रवार दिनांक ०८ ऑगस्ट २०२५**

**ठळक बातम्या**

1. **गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफी देण्याचं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचं आश्वासन.**
2. **शालार्थ प्रणालीद्वारे बोगस शिक्षक भरती प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारकडून समितीची स्थापना.**
3. **नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त शूरवीरांची वीरगाथा साकारणारे युद्ध स्मारकाच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता.**
4. **नागपूर जिल्ह्यातील पहिल्या स्मार्ट इंटेलिजंट सातनवरी या गावातील डिजिटल उपक्रमामध्ये ग्रामस्थानांचा सहभाग आवश्यक- विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी.**

**महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे**

राज्यातल्या शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा विषय लांबणीवर पडला नसून गरजू आणि पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळेल, असं महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काल छत्रपती संभाजीनगर इथं वार्ताहरांना सांगितलं. खऱ्या अर्थाने मदत हवी आहे, अशा शेतकऱ्यांचा विचार करण्यासाठी स्थापनकेलेल्या समितीचा अहवाल आल्यानंतर कर्जमाफीबाबत अंतिम निर्णय घेतला जाईल, असं ते म्हणाले. तुकडेबंदी कायद्यामुळे ज्या मिळकतींचीनोंदणी होत नाही, अशा घरमालकांच्या समस्यांवर लक्ष दिलं जात आहे, असं त्यांनी सांगितलं.

**शालार्थ आयडी**

शालार्थ प्रणालीद्वारे बोगस शिक्षक भरती प्रकरणाची चौकशी करण्यासाठी राज्य सरकारनं एका समितीची नेमणूक केली आहे. पुणे विभागीय आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार समितीचे अध्यक्ष असून पोलीस महानिरीक्षक मनोज शर्मा यांचाही यात समावेश आहे. ही चौकशी समिती राज्यातल्या सर्व उपसंचालक कार्यालया अंतर्गत शाळांमधल्या शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या बदलीची तपासणी करेल आणि त्याचा अहवाल शासनाला सादर करेल.

**वंदे भारत एक्सप्रेस**

नागपूरच्या अजनी रेल्वे स्थानकापासून ते पुणे पर्यंत नव्याने सुरू होणाऱ्या वंदे भारत एक्सप्रेस चा शुभारंभ येत्या रविवारी 10 ऑगस्टला नऊ वाजता होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी श्री माता वैष्णोदेवीकटरा-अमृतसर; बेळगाव-बंगळुरू आणि अजनी ते पुणे ट्रेनला हिरवी झेंडी दाखवणार आहे. बारा महिने प्रवाशांची गर्दी असणाऱ्या नागपूर-पुणे मार्गावर वंदे भारत एक्सप्रेस सुरू करावी अशी मागणी अनेक वर्षांपासून होत होती.

**संसद-ओम बिर्ला**

विविध मुद्द्यांवर विरोधी पक्षांच्या गोंधळामुळे संसदेचं कामकाज आजही बाधित झालं. राज्यसभेचं कामकाज सुरु झाल्यावर भारत छोडो चळवळीदरम्यान स्वातंत्र्यासाठी लढलेल्या स्वातंत्र्यसैनिकांना आदरांजली वाहण्यात आली. उद्या, नऊ ऑगस्ट रोजी ऐतिहासिक भारत छोडो चळवळीचा ८३ वा वर्धापन दिन आहे, जो देशाच्या स्वातंत्र्यासाठीच्या अथक संघर्षाचा एक निर्णायक अध्याय होता, असं उपसभापती हरीवंश यावेळी म्हणाले. त्यानंतर उपसभापतींनी विरोधकांनी विविध मुद्यांवर दिलेले २० स्थगन प्रस्ताव फेटाळून लावत असल्याचं सांगितलं. त्यामुळे विरोधकांनी समोर येऊन घोषणाबाजी करण्यास सुरुवात केली. राज्यसभेत सतत व्यत्यय येत असल्याने ५६ तासांहून अधिक वेळ वाया गेल्याचं सांगून, हरीवंश यांनी सदस्यांना कामकाज सुरु ठेवण्याचं आवाहन केलं. मात्र गदारोळ वाढत गेल्यानं सदनाचं कामकाज आधी दुपारी १२ वाजेपर्यंत आणि नंतर दिवसभरासाठी स्थगित झालं. लोकसभेतही भारत छोडो आंदोलनादरम्यान स्वातंत्र्यासाठी लढणाऱ्यांना आदरांजली वाहण्यात आली. याबद्दल बोलताना अध्यक्ष ओम बिर्ला म्हणाले -

***कल दिनांक 9 अगस्त को सम्पूर्ण भारत में "भारत छोड़ो आन्दोलन" की तिरासवीं जयंती मनाई जाएगी। इस अवसर पर हम राष्ट्रपिता महात्मा गाँधी और भारत की स्वतंत्रता के लिए अपना सर्वोच्च बलिदान देने वाले सभी अमर शहीदों को श्रद्धांजलि अर्पित करते हैं तथा अपने स्वतंत्रता संग्राम के उच्च आदर्शों के प्रति स्वयं को पुनः समर्पित करते हैं।***

सभागृहाने माजी सदस्य सत्यपाल मलिक यांनाही श्रद्धांजली वाहिली. त्यानंतर अध्यक्ष ओम बिर्ला यांनी प्रश्नोत्तराचा तास सुरू करण्याचा प्रयत्न केला. मात्र विरोधी पक्षांनी बिहारमधल्या मतदार यादी पुर्नरनिरक्षणाच्या मुद्यावर चर्चेची मागणी लाऊन धरली. बिर्ला यांनी सभागृहाच्या कामकाजात व्यत्यय आणल्याबद्दल नाराजी व्यक्त केली.

**बुलडाणा केळी**

बुलडाणा जिल्ह्यातल्या संग्रामपूर तालुक्यातल्या एका शेतकऱ्याने अभ्यासपूर्ण नियोजनाच्या माध्यमातून थेट इराणमध्ये केळ्यांची निर्यात सुरू केली आहे. तीन वर्षांपूर्वी नैसर्गिक आपत्तीमुळे शेत उद्ध्वस्त होऊनही न डगमगता सतीश टाकळकर यांनी आसपासच्या गावातल्या केळी उत्पादक शेतकऱ्यांसह निर्यातयोग्य दर्जाच्या केळ्यांचं उत्पादन घेतलं आहे. या निर्यातीतून त्यांना उत्तम मोबदलाही मिळाला आहे. याविषयी बोलताना टाकळकर म्हणाले -

***सोलापूर आणि महाराष्ट्रातील इतर निर्यातदार व्यापारी आहेत आणि जे एजेंट आहे ते माझ्याकडे आले आणि त्यांनी माझा माल बघितला आणि माझा माल त्यांना पसंद आला. आमच्या तालुक्यामधून दोन-तीन शेतकऱ्यांची केळी एक्सपोर्ट झाली आणि त्यामध्ये एक माझा शेत आहे. वेगवेगळ्या कंपनीची माहिती घेऊन त्या पद्धतीने शेतामध्ये नियोजन करून हि अशी एक्स्पोर्ट दर्जेची केळी पिकवलेली आहे.***

**माझी वसुंधरा अभियान 6.0**

"माझी वसुंधरा" अभियानाचा प्रारंभ 2 ऑक्टोबर 2020 रोजी झाला असून, यावर्षी 5 जून 2025 रोजी सहाव्या टप्प्याचा (6.0) औपचारिक शुभारंभ करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या "माझी वसुंधरा अभियान 6.0" च्या प्रभावी अंमलबजावणीसाठी चंद्रपूर महानगरपालिका सभागृहात उपायुक्त संदीप चिद्रवार यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक पार पडली. बैठकीत वातावरणीय बदलांच्या पार्श्वभूमीवर स्थानिक स्वराज्य संस्थांनी राबवायच्या उपाययोजना, MIS पोर्टलवरील नोंदणी प्रक्रिया, टूलकिटचे पालन आणि मूल्यांकन प्रक्रियेचे महत्त्व या विषयांवर सविस्तर चर्चा झाली.

**युद्ध स्मारक**

नागपूर महानगरपालिकेच्या अमृत महोत्सवानिमित्त स्वातंत्र्योत्तर काळात झालेल्या चार प्रमुख युद्धात प्राणांची आहुती देणाऱ्या तसेच शौर्य गाजविणाऱ्या शूरवीरांची वीरगाथा साकारणारे युद्ध स्मारक टेकडी रोडवरील संरक्षण विभागाच्या जागेवर उभारण्याच्या नागपूर महानगरपालिकेच्या प्रस्तावाला प्रशासकीय मान्यता मिळाली आहे. या युद्ध स्मारकामध्ये सन १९६२ चे चीन युद्ध, सन १९६५ चे पाकिस्तान युद्ध, सन १९७१ चे बांगलादेश युद्ध आणि १९९९ चे कारगिल युद्धात देशासाठी शौर्य गाजविणाऱ्या व शहीद झालेल्या वीरांची गाथा साकारली जाणार आहे. हे युद्ध स्मारक मुले तसेच तरुणांना देशासाठी शौर्य गाजविण्याची प्रेरणा मिळावी, असे मत महानगरपालिका आयुक्त डॉ. चौधरी यांनी व्यक्त केले तसेच या स्मारकात सार्वजनिक हित तसेच जनतेच्या भावना दुखावणार नाही, याची काळजी स्मारकाचे डिझाईन तयार करताना घ्यावी, असे निर्देश स्वयंसेवी संस्थेला दिले आहे. या युद्ध स्मारकासाठी नागपूर महानगरपालिकेने १० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यास तयारी दर्शविली आहे. या युद्ध स्मारकासाठी महानरपालिकेतर्फे दोन सामंजस्य करार केले जाणार आहे. पहिला करार नागपूर महानगरपालिका आणि संरक्षण विभागांमध्ये होणार आहे. हा करार जागेच्या संदर्भात राहणार आहे. तसेच दुसरा सामंजस्य करार युद्ध स्मारकचे डिझाईन तयार करणाऱ्या नागपूर २०२५ या स्वयंसेवी संस्थेशी केला आहे.

**स्मार्ट इंटेलिजंट गाव**

देशातील सर्वात स्मार्ट इंटेलिजंट गाव म्हणून निवड झालेल्या नागपूर जिल्हा सातनवरी या गावामध्ये व्हॉईस ऑफ इंडिया कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी या संस्थेच्या माध्यमातून विविध डिजिटल उपक्रमांना सुरूवात झाली आहे. डिजिटल बेस विविध सुविधांचा प्रत्यक्ष लाभ गावाच्या सर्वांगिण विकासासाठी होणार असल्यामूळे ग्रामस्थांनी या उपक्रमामध्ये सक्रिय सहभाग घेण्याचे आवाहन, विभागीय आयुक्त बिदरी यांनी केले. बिदरी यांनी स्मार्ट इंटेलिजंट गाव म्हणून निवड झालेल्या सातनवरी या गावाला भेट दिली. तसेच व्हाईस संस्थेशी निगडीत विविध पंधरा कंपन्यांनी सुरू केलेल्या कामांची पाहणी केली. देशातील स्मार्ट इंटेलिजंट गाव तयार करण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिलेल्या

सूचनेनुसार ऑप्टीकल फायबर कनेक्टिविटी असलेल्या सातनवरी या गावाची निवड करण्यात आली आहे.

**हवामान**

प्रादेशिक हवामान विभागाने वर्तविलेल्या अंदाजानुसार येत्या काही तासात अमरावती, चंद्रपूर, नागपूर, गडचिरोली, गोंदिया, भंडारा, वर्धा आणि यवतमाळ इथं काही ठिकाणी वादळ आणि मेघगर्जनेसह आणि हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस पडण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान, काहीवेळा पूर्वी गोंदिया इथे पावसानं जोरदार हजेरी लावल्याच वृत्त आहे.

**हर घर तिरंगा**

येत्या स्वातंत्र्यदिनाच्या पार्श्वभूमीवर देशभरात 'हर घर तिरंगा' मोहिमेला आजपासून सुरुवात झाली. या मोहिमेअंतर्गत विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. येत्या स्वातंत्र्यदिनापर्यंत चालणाऱ्या या मोहिमेत येत्या मंगळवारी 12 ऑगस्ट रोजी तिरंगा मॅरेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. नागपूरकरांनी 'एक दौड देशभक्तीसाठी' या उपक्रमात मोठ्या संख्येने सहभागी व्हावं असं आवाहन नागपूर महानगरपालिकेकडून करण्यात आला आहे. मॅरेथॉन मध्ये सहभागी नागरिकांना अनेक आकर्षक बक्षिसा दिली जाणार आहेत. त्यासाठी www.nmcnagpur.gov.in या संकेतस्थळावर नोंदणी करायची आहे नोंदणीची अंतिम तारीख 10 ऑगस्ट आहे. तर 11 ऑगस्ट रोजी यशवंत स्टेडियम इथे दुपारी दोन ते संध्याकाळी पाच या वेळेत टी-शर्ट वितरण केलं जाणार आहे.

******